## प्रसिध्दीपत्रक

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) 2021

## परीक्षा दिनांक 21 नोव्हेंबर 2021

## अंतिम उत्तरसूची

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक 21 नोव्हेंबर 2021 रोजी घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेची अंतरिम उत्तरसूची दि. 02/12/2021 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. या परीक्षेच्या पेपर क्रमांक 1 व पेपर क्रमांक 2 च्या प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तराबाबत त्रुटी/आक्षेप असल्यास ते परीक्षा परिषदेकडे बुधवार दि. 08/12/2021 अखेरपर्यंत पाठविणेबाबत दि. 02/12/2021 रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले होते. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेवून अंतिम उत्तरसूची प्रसिध्द करण्यात येत आहे. या अंतिम उत्तरसूचीबाबत कोणतेही निवेदन/आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

या अंतिम उत्तरसूचीनुसार MAHATET - 2021 परीक्षेचा निकाल यथावकाश परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याचीही संबंधित परीक्षार्थींनी नोंद घ्यावी.

दि. 20/06/2022

ठिकाण : पुणे

20/6/2022.

(शैलजा दराडे)

**आयुक्त,**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

पुणे - 01